# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ. आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

## अराजपत्रित कर्मचाऱ्यांसाठी मराठी भाषा उच्चस्तर परीक्षा

वार, दिनांक

(वेळ - सकाळी १०.३० ते दुपारी १.००)

(एकूण गुण - १००)

## प्रश्नपत्रिका एक--विहित पाठ्यपुस्तक व कार्यरूप व्याकरण

सूचनाः- प्रत्येक प्रश्नाचे गुण त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

**गुण**

**प्र. १** खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे १० ते १२ ओळींत उत्तर लिहा :- **१०**

(१) चैत्रातील हळदीकुंकवाची बायका का बरे वाट पहात आणि त्याची कशी तयारी करीत?

(२) नाईकांच्या घरी दरवषी होणा-या हळदीकुंकवाचे वर्णन करा.

(३) राजूच्या आईने संपूर्ण गावाचे हळदीकुंकू करायचे का ठरवले?

(४) गुलजार यांनी आपल्या लहानपणाच्या झाडांच्या कोणत्या आठवणी लिहिल्या आहेत?

(५) लेखकाने आपल्या घरासमोरची जागा कशी जोपासली आहे?

(६) गुलजार यांनी आपल्या पाठाला "फॅमिली ट्री" असे नाव का दिले आहे?

(७) अमीरचे कोणते स्वभावविशेष लक्षात येतात?

(८) समीरच्या वडिलांविषयी माहिती लिहा.

(९) "अमीर, मनाचाही तू अमीर आहेस" असे लेखक का म्हणतात?

(१०) जूलियाचे व्यक्तिचित्र तुमच्या शब्दात रेखाटा.

(११) क्षितींद्रचा जूलियाशी सहवास कसा वाढला ?

(१२) जूलिया लंडनला गेल्यानंतर क्षितींद्रच्या मनःस्थितीचे वर्णन करा.

(१३) आजोबांनी दिलेले गुलाबाचे फूल मिळाल्यावर आजीने काय केले ?

(१४) "सकाळचा अभ्यास" पाठातून अभ्यास करणाऱ्या भावंडांच्या भांडणाचे वर्णन कसे करण्यात आले आहे.

(१५) "चैत्र" कथेतून स्वाभिमानी स्त्रीचे व्यक्तिचित्रण कसे करण्यात आले आहे?

(१६) "फॅमिली ट्रिप" पाठातून लेखकाने निसर्गाबरोबर असलेले आपले नाते कसे स्पष्ट केले आहे?

(१७) "अमीर" पाठातून अमीरचे कोणते स्वभाव विशेष लक्षात येतात?

(१८) लेखक उत्तम कांबळे यांनी माणूस होण्याचे कोणत्या परिस्थितीवरून ठरविले?

(१९) बदलापूरचे घर हे लेखिकेसाठी जिव्हाळ्याचा विषय कसे ठरले?

(२०) पहाटे जाग आल्यावर लंपनला काय समजेनासे झाले?

(२१) "वराती मागनं घोडं" असे आजी लंपनला का म्हणते ?

**प्र. २** पाठाच्या आधारे खालीलपैकी **पाच** प्रश्नांची ६ ते ८ ओळीत उत्तरे लिहा :- **२५**

(१) लंपनचा दिशांचा गोंधळ कसा होतो ?

(२) आजोबांच्या हालचालींचे वर्णन करा.

(३) "गुड मॉर्निंग विषयी गणुदादा काय शिकला होता ?

(४) ताई आणि जूलिया यांच्यात क्षितींद्रला कोणते साम्य वाटते ?

(५) ज्योत्सना कदम आणि त्यांच्या कुटुंबीयांना कौलारू घरात आल्यानंतर कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागले होते ?

(६) ज्योत्सना कदम यांनी त्यांच्या घरासभोवारच्या जागेचा वापर कशाप्रकारे केला होता ?

(७) ज्योत्सना कदम यांनी कौलारू घरात अनुभवलेल्या पावसाळ्याचे वर्णन करा.

(८) ज्योत्सना कदम यांच्या भावाने कौलारू घराची अडचण कशाप्रकारे जतन करून ठेवली होती ?

(९) जोतीराव फुले आणि त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना कोणकोणत्या संकटांना तोंड द्यावे लागले होते ?

(१०) सावित्रीबाई फुले यांचा स्वभाव कसा होता ?

(११) सावित्रीबाई फुले यांनी समाजकार्याला कशाप्रकारे वाहून घेतले होते ?

(१२) सावित्रीबाई फुले यांनी जोतीरावांचे चिरंतन स्मारक कशाप्रकारे उभारले होते ?

(१३) ज्योत्सना कदम यांच्या घराच्या आजूबाजूला काय होते ?

(१४) ज्योत्सना कदम यांच्या परसबागेत पावसाळ्यात कोणती फुलझाडे फुलायची ?

(१५) ज्योत्सना कदम यांची आई "कुठल्या जंगलात आणून टाकलंय तुमच्या वडिलांनी!" असे रागावून का म्हणायची ?

(१६) ज्योत्सना कदम ओटयावर बसून काय काय करायच्या ?

(१७) ज्योत्सना कदम यांच्या घरात कोणते सणवार व सोहळे साजरे केले जायचे ?

(१८) ज्योत्सना कदम यांना रडू का कोसळले ?

(१९) सावित्रीबाई फुले यांचा पोशाख कसा होता ?

(२०) सावित्रीबाई फुले यांना स्त्रीजातीविषयी काय वाटे ?

(२१) जोतीरावांच्या अंतयात्रेच्या समयी सावित्रीबाई फुले यांनी कोणते धैर्य दाखवले ?

(२२) जोतीरावांच्या मृत्यूनंतर सावित्रीबाई फुले यांनी कोणत्या चळवळीचे नेतृत्व केले ?

(२३) सावित्रीबाई फुले यांचा मृत्यू कसा झाला ?

(२४) अभ्यास करताना दामूला कोणकोणत्या अडचणी येतात ?

(२५) अभ्यास करताना दिनूला कोणकोणत्या अडचणी येतात ?

(२६) जगूमुळे दामूला व दिनूला कोणत्या प्रसंगाना तोंड द्यावे लागते ?

(२७) दामू इंग्लंडमधील दोन प्रसिध्द शहरांची नावे वेगवेगळ्या प्रकारे घेतो त्यातील विनोदी छटा सांगा.

(२८) "सकाळचा अभ्यास " या पाठातील विनोदी घटना विशद करा.

(२९) दामूची दौत सांडल्यामुळे पुढे कोणता प्रसंग उत्पन्न होतो ?

(३०) दामूला दिनूच्या पिशवीमध्ये कोणती गोष्ट शोधावयाची आहे त्यामुळे पुढे कोणते प्रसंग घडतात ?

(३१) "आई" कोणाला म्हटले आहे, आईची कहाणी सांगा.

(३२) "मराठीची कहाणी" या पाठात वर्णन केलेले ढग कोणत्या दिशेकडून आले ?

(३३) महाराष्ट्रभर पसरलेल्या कुळांच्या नामावलीचे वर्णन करा.

(३४) देवाला विजेलाही खाली आणावेसे का वाटले ?

(३५) देवाने निर्माण केलेल्या मूर्तीमधील वापरलेल्या नैसर्गिक रूपांची ओळख करून द्या.

(३६) "मराठीची कहाणी" ही कहाणी ऐकल्याने काय होते ?

(३७) देवाने मराठीसाठी महाराष्ट्राचा पाळणा केला तो कसा सजविला ?

(३८) चैत्रातील हळदीकुंकवाबद्दल राजूच्या मनात येणारे विचार त्याच्या शब्दात लिहा.

(३९) राजूच्या घरी हळदीकुंकू झाल्यावर बरीच दमछाक होऊनही त्याला कोणत्या गोष्टींचा आनंद झाला?

(४०) नाईकबाई आणि नाईककाकू यांच्या स्वभावातील फरक कोणता?

(४१) नाईकांच्या घरी हळदीकुंकवाला जाण्याचा आग्रह राजूने आपल्या आईला का केला? तेथून परतताना कशाचे वाईट वाटत होते?

(४२) माणूस हा झाडासारखा आहे असे गुलजार का म्हणतात?

(४३) मानवी संस्कृतीत पिंपळाचे स्थान काय?

(४४) आपली एकेकाळची मैत्रीण राखी हिने दिलेल्या झाडाबद्दल गुलजार कसे भावुक होतात?

(४५) गुलजार यानी पांढऱ्या चाफ्याला "बडी माँ" असे नाव का दिलेआहे?

(४६) राजूच्या आईने हळदीकुंकवाला लागणाऱ्या पैशांची व्यवस्था कशी केली?

(४७) राजूच्या वडिलांनी राजूच्या आईला कशी साथ दिली?

(४८) राजूच्या आईने घरच्या हळदीकुंकवाची तयारी कशी केली?

(४९) "टांगलेल्या दह्याच्या गाठोड्यासारखा चेहरा" ह्या वाक्प्रयोगाचे स्पष्टीकरण करा.

(५०) नाईककाकूंच्या मनाचा मोठेपणा पाठात कसा व्यक्त झाला आहे?

(५१) राजूच्या आईने नाईक काकूंना काय उत्तर दिले?

(५२) लेखकाला जांभळाचे झाड आजोबांसारखे का वाटते?

(५३) लेखकाने कोणकोणत्या प्रकारांनी झाडांशी मैत्री जोडली आहे?

(५४) झाडांच्या पानगळीचे वर्णन लेखकाने कसे केले आहे?

(५५) आडाच्या दिशेने चालू लागल्यावर लेखकाच्या मनात कोणते विचार आले?

(५६) आपला मुलगा पास झाल्याचा आनंद आक्का का व्यक्त करत नव्हती?

(५७) शिकून मोठा झाल्यावर लेखकाने कोणकोणत्याअपेक्षा बाळगल्या होत्या?

(५८) ग्यानबाचे व्यक्तिचित्रण करा.

(५९) अमीरच्या वडिलांच्या परिस्थितीचे वर्णन करा.

(६०) अमीरचे कुटुंब काठेवाडहून नवीन गावी आले त्यावेळच्या त्याच्या कुटुंबाविषयी माहिती लिहा.

**प्र. ३** कवितांच्या आधारे खालीलपैकी **तीन** प्रश्नांची ६ ते ८ ओळीत उत्तरे लिहा :- **१५**

(१) कवीकडे लहानपणी कोणती खेळणी होती ?

(२) पुढे हाती आलेली खेळणी कोणती ?

(३) कवीने या कवितेत खेळणीच्या रूपाने कोणता बोध दिला आहे ?

(४) खेळण्यांच्या जागी खेळ आले असे कवी का म्हणतो ?

(५) कवीने लहानपण व मोठेपण यामधील खेळण्यांची सांगड कशी घातली आहे ?

(६) कवीकडे किती मातीचे बैल होते ?

(७) खेळ आल्याने कशाचा खेळ झाला ?

(८) कळसूत्री बाहुल्या कशा होत्या ?

(९) कवीने स्वत: केलेली खेळणी कोणती होती ?

(१०) आपला मुलगा रणांगणावर जाण्यास निघाल्यावर होणारा आनंद कवयित्रीने कोणत्या शब्दात व्यक्त केला आहे?

(११) मुलाला निरोप देताना आपण दु:ख करणार नाही, हे कवयित्री कोणत्या शब्दांत सांगते?

(१२) रणांगणावर जाण्यास निघालेल्याआपल्या मुलाला कवयित्रीने कोणता आशीर्वाद दिला आहे?

(१३) "श्वास" कवितेतून कवीने पावसाची आराधना कोणत्या शब्दात केली आहे?

(१४) कष्टणाऱ्या शेतकऱ्यांची व्यथा कवितेतून कशी व्यक्त झाली आहे?

**प्र. ४** खालीलपैकी कोणत्याही **पाच** वाक्प्रचारांचा अर्थ लिहून त्या वाक्प्रचारांचा अर्थपूर्ण वाक्यात उपयोग करा :- **१०**

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | सव्यापसव्य करणे | (३६) | तोंड दाबून बुक्क्यांचा मार |
| (२) | तिळपापड होणे | (३७) | भुकेने कासावीस होणे |
| (३) | अरेरावी करणे | (३८) | डोक्याला हात लावून बसणे |
| (४) | वेच करणे | (३९) | बोळवण करणे |
| (५) | कान फुंकणे | (४०) | आकाश कोसळणे |
| (६) | जीवन-सर्वस्व देणे | (४१) | डोळयांत तेल घालून पाहणे |

| | | | |
|---|---|---|---|
| (७) | नेत्रासमोर सूर्य फिरणे | (४२) | जीव ओवाळून टाकणे |
| (८) | निश्चेष्ट पडणे | (४३) | अंधार मी म्हणणे |
| (९) | अंगवळणी पडणे | (४४) | नवतीचा संसार |
| (१०) | जळात राहून माशाशी वैर करणे | (४५) | मोडेन पण वाकणार नाही |
| (११) | अवकळा येणे | (४६) | हुडहुडी भरणे |
| (१२) | मान खाली घालणे | (४७) | दक्षता घेणे |
| (१३) | देशोधडीला लागणे | (४८) | मागोवा घेणे |
| (१४) | ख्याली खुशाली विचारणे | (४९) | मात करणे |
| (१५) | शरपंजरी पहुडणे | (५०) | कीव करणे |
| (१६) | गंडा बांधणे | (५१) | सामावून जाणे |
| (१७) | धास्ती खाणे | (५२) | अलिप्त राहणे |
| (१८) | उरी फुटणे | (५३) | रवानगी करणे |
| (१९) | काळाची पावले ओळखणे | (५४) | फुशारकी करणे |
| (२०) | वाभाडे काढणे | (५५) | मरगळ झटकने |
| (२१) | ब्रह्मानंद होणे | (५६) | सनक येणे |
| (२२) | मन गांगरून जाणे | (५७) | वसा घेणे |
| (२३) | पोटाला चिमटा घेणे | (५८) | कान फुंकणे |
| (२४) | खनपटीस बसणे | (५९) | जोर करणे |
| (२५) | कोंडयाचा मांडा करणे | (६०) | कान फुंकणे |
| (२६) | कुरूक्षेत्र माजविणे | (६१) | वेच करणे |
| (२७) | कुंपणाने शेत खाणे | (६२) | तळमळ होणे |
| (२८) | लचक भरणे | (६३) | प्रक्षोभ होणे |
| (२९) | इहलोक सोडून जाणे | (६४) | तोंडचे पाणी पळणे |
| (३०) | ब्रह्मांड आठवणे | (६५) | उरी फुटणे |
| (३१) | धास्ती खाणे | (६६) | मनधरणी करणे |
| (३२) | परका होणे | (६७) | कासावीस होणे |
| (३३) | मन गांगरून जाणे | (६८) | हात टेकणे |
| (३४) | बहिष्कृत करणे | (६९) | पाठ दाखवणे |
| (३५) | दुखणे विकोपास जाणे | (७०) | छेड काढणे |

**प्र. ५** गट **"अ"** मध्ये दिलेल्या क्रियापदांची गट **"ब"** मध्ये दिलेल्या समानार्थी क्रियापदांबरोबर जुळणी करा :- **१०**

१.

| | गट **"अ"** | | गट **"ब"** |
|---|---|---|---|
| (१) | नजरेस आणणे | (१) | To suspend |
| (२) | आग्रह धरणे | (२) | To pledge |

| | | | |
|---|---|---|---|
| (३) | दूर करणे | (३) | To bring to notice |
| (४) | कृपा करणे | (४) | To redress |
| (५) | मुक्त करणे | (५) | To insist on |
| (६) | तक्रार करणे | (६) | To prepare |
| (७) | निलंबित करणे | (७) | To reconcile |
| (८) | प्रतिज्ञा करणे | (८) | To discharge to receive |
| (९) | मेळ घालणे | (९) | To complain |
| (१०) | तयार करणे | (१०) | To favour |

२.

| | गट **"अ"** | | गट **"ब"** |
|---|---|---|---|
| (१) | पर्यवेक्षण करणे | (१) | To lecture |
| (२) | सर्वेक्षण करणे | (२) | To cook |
| (३) | निरीक्षण करणे | (३) | To supervise |
| (४) | परीक्षा करणे | (४) | To inspect |
| (५) | सन्मान करणे | (५) | To survey |
| (६) | अपमान करणे | (६) | To condone |
| (७) | व्याख्यान देणे | (७) | To take exercise |
| (८) | स्वयंपाक करणे | (८) | To honour |
| (९) | व्यायाम करणे | (९) | To insult |
| (१०) | क्षमापित करणे | (१०) | To examine |

३.

| | गट **"अ"** | | गट **"ब"** |
|---|---|---|---|
| (१) | माफ करणे | (१) | To exert |
| (२) | जाहीर करणे | (२) | To purchase |
| (३) | उद्घाटन करणे | (३) | To announce |
| (४) | विचार करणे | (४) | To excuse |

| | | | |
|---|---|---|---|
| (५) | अनुवाद करणे | (५) | To weigh |
| (६) | परिश्रम करणे | (६) | To work |
| (७) | प्रवास करणे | (७) | To think |
| (८) | खरेदी करणे | (८) | To inaugurate |
| (९) | वजन करणे | (९) | To translate |
| (१०) | काम करणे | (१०) | To travel |

४. गट "**अ**" — गट "**ब**"

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | तक्रार करणे | (१) | To file a suit |
| (२) | प्रार्थना करणे | (२) | To postpone |
| (३) | पूजा करणे | (३) | To study |
| (४) | फिर्याद करणे | (४) | To try |
| (५) | प्रयत्न करणे | (५) | To worship |
| (६) | रसग्रहण करणे | (६) | To pray |
| (७) | स्थगित करणे | (७) | To appreciate |
| (८) | संदर्भ करणे | (८) | To complain |
| (९) | अभ्यास करणे | (९) | To spend |
| (१०) | खर्च करणे | (१०) | To refer |

५. गट "**अ**" — गट "**ब**"

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | लिलाव करणे | (१) | To serve |
| (२) | धूम्रपान करणे | (२) | To mend |
| (३) | सही करणे | (३) | To smoke |
| (४) | बंद करणे | (४) | To auction |

| | | | |
|---|---|---|---|
| (५) | उघड करणे | (५) | To congratulate |
| (६) | सेवा करणे | (६) | To welcome |
| (७) | परत करणे | (७) | To close |
| (८) | दुरूस्त करणे | (८) | To sign |
| (९) | अभिनंदन करणे | (९) | To expose |
| (१०) | स्वागत करणे | (१०) | To return |

६.

| | गट **"अ"** | | गट **"ब"** |
|---|---|---|---|
| (१) | नोंद करणे | (१) | To request |
| (२) | दंड करणे | (२) | To order |
| (३) | शिक्षा करणे | (३) | To specify |
| (४) | विनंती करणे | (४) | To prove |
| (५) | सिध्द करणे | (५) | To punish |
| (६) | स्तुती करणे | (६) | To fine |
| (७) | हुकूम करणे | (७) | To praise |
| (८) | नाखूश करणे | (८) | To register |
| (९) | उल्लेख करणे | (९) | To fondle |
| (१०) | लाड करणे / गोंजारणे | (१०) | To displease |

७.

| | गट **"अ"** | | गट **"ब"** |
|---|---|---|---|
| (१) | प्रेम करणे | (१) | To sanction |
| (२) | क्षमा करणे | (२) | To imagine |
| (३) | नामंजूर करणे | (३) | To love |
| (४) | टीका करणे | (४) | To refuse |

| | | | |
|---|---|---|---|
| (५) | प्रयोग करणे | (५) | To pardon |
| (६) | द्वेष करणे | (६) | To resolve |
| (७) | मंजूर करणे | (७) | To hope |
| (८) | कल्पना करणे | (८) | To experiment |
| (९) | आशा करणे | (९) | To hate |
| (१०) | निश्चय करणे | (१०) | To criticize |

८. गट **"अ"** गट **"ब"**

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | तुलना करणे | (१) | To write |
| (२) | स्वच्छ करणे | (२) | To withdraw |
| (३) | प्रारंभ करणे | (३) | To compare |
| (४) | स्नान करणे | (४) | To commence |
| (५) | पसंत करणे | (५) | To clean |
| (६) | वाढणे | (६) | To verify |
| (७) | लिहिणे | (७) | To visit |
| (८) | काढणे, काढून घेणे | (८) | To choose, to prefer |
| (९) | भेट देणे | (९) | To serve |
| (१०) | पडताळणी करणे | (१०) | To bathe |

९. गट **"अ"** गट **"ब"**

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | उणे करणे | (१) | To embrance |
| (२) | उचलून धरणे | (२) | To drink |
| (३) | झुंजणे | (३) | To promote, to uphold |
| (४) | आत्मसात करणे | (४) | To subtract |

| | | | |
|---|---|---|---|
| (५) | आभारी असणे | (५) | To resummon |
| (६) | अलिंगन देणे | (६) | To roam |
| (७) | पहाट होणे | (७) | To make one's own |
| (८) | प्राशन करणे | (८) | To fight |
| (९) | पुन्हा बोलावणे | (९) | To feel obliged |
| (१०) | भटकणे | (१०) | To dawn |

१०. गट "**अ**" गट "**ब**"

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | व्यवस्था पाहणे | (१) | To realize |
| (२) | कवाइतीने जाणे | (२) | To reassign |
| (३) | ध्यान करणे | (३) | To manage |
| (४) | स्थलांतर करणे | (४) | To meditate |
| (५) | खनिज रूप देणे | (५) | To march |
| (६) | घाम येणे | (६) | To plot |
| (७) | व्यूह रचणे | (७) | To taunt |
| (८) | प्रत्यक्षात आणणे | (८) | To mineralise |
| (९) | पुन्हा अभिहस्तांकित करणे | (९) | To perspire |
| (१०) | टोमणा मारणे | (१०) | To migrate |

११. गट "**अ**" गट "**ब**"

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | सोडून देणे | (१) | To consent |
| (२) | संक्षेप करणे | (२) | To approve |
| (३) | फरारी होणे | (३) | To abandon |

| | | | |
|---|---|---|---|
| (४) | शोषून घेणे | (४) | To abscond |
| (५) | दुरुपयोग करणे | (५) | To abbreviate |
| (६) | वेग वाढवणे | (६) | To accommodate |
| (७) | संमती देणे | (७) | To accept |
| (८) | मान्य करणे | (८) | To abuse |
| (९) | स्वीकारणे | (९) | To accelerate |
| (१०) | सोय करणे | (१०) | To absorb |

१२.

| | गट "**अ**" | | गट "**ब**" |
|---|---|---|---|
| (१) | बरोबर जाणे | (१) | To acknowledge |
| (२) | सिध्दीस नेणे | (२) | To activate |
| (३) | जमाखर्च ठेवणे | (३) | To accomplish |
| (४) | संचय करणे | (४) | To accompany |
| (५) | साध्य करणे | (५) | To add |
| (६) | पोच देणे | (६) | To addict |
| (७) | कार्यवाही करणे | (७) | To accumulate |
| (८) | क्रियाशील करणे | (८) | To account |
| (९) | भर घालणे | (९) | To achieve |
| (१०) | चे व्यसन लागणे | (१०) | To act |

**प्र. ६** खालीलपैकी **पाच** शब्दांचे लिंग बदला :- **५**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) | आजा | (२८) | वाघ | (५५) | विधुर |
| (२) | कुमारी | (२९) | आई | (५६) | शेळी |
| (३) | मेंढा | (३०) | शिक्षक | (५७) | कन्या |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (४) | शेजारीण | (३१) | मोर | (५८) | लेखक |
| (५) | गायक | (३२) | कुमार | (५९) | कुणबी |
| (६) | आई | (३३) | कुंभार | (६०) | पेटारा |
| (७) | अध्यापक | (३४) | दीर | (६१) | नदी |
| (८) | जाऊ | (३५) | नर्तकी | (६२) | पक्षी |
| (९) | लांडोर | (३६) | पुरूष | (६३) | श्रीयुत |
| (१०) | वडील | (३७) | सून | (६४) | गाडी |
| (११) | अध्यापिका | (३८) | विधवा | (६५) | गायक |
| (१२) | शेजारीण | (३९) | सेवक | (६६) | नात |
| (१३) | नट | (४०) | बोका | (६७) | मेंढी |
| (१४) | हत्ती | (४१) | सासरा | (६८) | तेली |
| (१५) | पाहुणा | (४२) | पीडित | (६९) | नायक |
| (१६) | शिक्षक | (४३) | वीर | (७०) | बायको |
| (१७) | गृहिणी | (४४) | विद्यार्थी | (७१) | पुत्र |
| (१८) | तरूण | (४५) | बालक | (७२) | वर |
| (१९) | विदुषी | (४६) | पुस्तक | (७३) | स्त्री |
| (२०) | म्हातारी | (४७) | कुमार | (७४) | कावळा |
| (२१) | बंधू | (४८) | दास | (७५) | युवक |
| (२२) | बालिका | (४९) | सुतारीण | (७६) | मैत्रीण |
| (२३) | कवि | (५०) | तेलीण | (७७) | महिला |
| (२४) | विद्वान | (५१) | मुलगा | (७८) | व्याही |
| (२५) | घोंडा | (५२) | राजपुत्र | (७९) | मित्र |
| (२६) | आजी | (५३) | बहीण | (८०) | कवयित्री |
| (२७) | नवरा | (५४) | कोळी | (८१) | सासू |

**प्र. ७** खालीलपैकी **पाच** शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा :- **५**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) | हिशेबी | (२६) | वर्तणूक | (५१) | जड |
| (२) | अपेक्षित | (२७) | साक्षर | (५२) | हळूहळू |
| (३) | उदार | (२८) | विश्वास | (५३) | अंधार |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (४) | विचारी | (२९) | श्रध्दा | (५४) | यशस्वी |
| (५) | शुभ | (३०) | मित्र | (५५) | बाहेर |
| (६) | सतेज | (३१) | स्वस्थ | (५६) | जबाबदार |
| (७) | सूर्योदय | (३२) | बोलका | (५७) | उद्योगी |
| (८) | पवित्र | (३३) | सुंदर | (५८) | प्रस्तुत |
| (९) | लाजरा | (३४) | आवडता | (५९) | निरर्थक |
| (१०) | सौंदर्य | (३५) | काळा | (६०) | अधिक |
| (११) | रोगी | (३६) | आनंद | (६१) | जवळ |
| (१२) | प्रश्न | (३७) | वरिष्ठ | (६२) | समोर |
| (१३) | सज्जन | (३८) | सौभाग्य | (६३) | सगुण |
| (१४) | धर्म | (३९) | दुष्काळ | (६४) | उपकार |
| (१५) | न्याय | (४०) | अप्रामाणिक | (६५) | शहाणा |
| (१६) | स्मरण | (४१) | दूर | (६६) | आज्ञा |
| (१७) | प्रिय | (४२) | श्रीमंत | (६७) | हुशार |
| (१८) | यश | (४३) | आळशी | (६८) | उदार |
| (१९) | उच्च | (४४) | आघाडी | (६९) | नि:स्वार्थी |
| (२०) | कनिष्ठ | (४५) | आवड | (७०) | नैतिक |
| (२१) | सावध | (४६) | सुलभ | (७१) | शिक्षित |
| (२२) | धनवान | (४७) | सुख | (७२) | मान |
| (२३) | सबळ | (४८) | निश्चिंत | (७३) | स्तुती |
| (२४) | सुखकर | (४९) | समंजस | (७४) | समान |
| (२५) | दोषी | (५०) | व्यवस्था | (७५) | सूर्यास्त |
| (७६) | मधुर | (८१) | धर्म | (८६) | पवित्र |
| (७७) | जिवंत | (८२) | डोळस | (८७) | जबाबदार |
| (७८) | शाकाहार | (८३ | उदास | (८८) | सम |
| (७९) | निंदा | (८४) | ताजा | (८९) | गबाळा |

| | | | |
|---|---|---|---|
| (८०) | उन्हाळा | (८५) | बाहेर |

**प्र. ८** खालीलपैकी **पाच** शब्दांची विशेषणे बनवा :- **५**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) | लोभ | (२६) | सुख | (५१) | कष्ट |
| (२) | इमान | (२७) | आकाश | (५२) | स्वच्छ |
| (३) | स्वार्थ | (२८) | ढग | (५३) | सप्ताह |
| (४) | वैद्यक | (२९) | स्वावलंबन | (५४) | तंत्र |
| (५) | समाधान | (३०) | हस्तीदंत | (५५) | वर्ष |
| (६) | प्रमाण | (३१) | सुदैव | (५६) | विजय |
| (७) | कीर्ती | (३२) | प्रदेश | (५७) | विभाग |
| (८) | शक्ती | (३३) | राष्ट्र | (५८) | आळस |
| (९) | गरज | (३४) | व्यसन | (५९) | दुर्गुण |
| (१०) | अभ्यास | (३५) | इच्छा | (६०) | मळणे |
| (११) | गरिबी | (३६) | सनातन | (६१) | जुने |
| (१२) | हुशारी | (३७) | कष्ट | (६२) | हिंसा |
| (१३) | चांगलेपणा | (३८) | औदार्य | (६३) | प्रपंच |
| (१४) | परंपरा | (३९) | चांगलेपणा | (६४) | गर्व |
| (१५) | प्रयोग | (४०) | लोक | (६५) | गोडी |
| (१६) | कल्पना | (४१) | उपचार | (६६) | ताजेपणा |
| (१७) | व्यवहार | (४२) | प्रशासन | (६७) | शरीर |
| (१८) | राग | (४३) | सदाचार | (६८) | लोभ |
| (१९) | लज्जा | (४४) | राग | (६९) | प्रगती |
| (२०) | समाज | (४५) | बन | (७०) | संसार |
| (२१) | इतिहास | (४६) | उपास | (७१) | व्यवसाय |
| (२२) | उद्योग | (४७) | ज्ञान | | |
| (२३) | सोने | (४८) | अपराध | | |
| (२४) | रुपे | (४९) | रंग | | |
| (२५) | दु:ख | (५०) | कंटाळा | | |

**प्र. ९** कंसातील सूचनांनुसार बदल करून वाक्ये पुन्हा लिहा :- **५**

(१) आपण उपाशी राहवे. (नकारार्थी करा)

(२) पाखरू आकाशात उडते. (वचन बदलून वाक्य लिहा)

(३) अधिकारी रजा मंजूर करतात. (पूर्ण वर्तमानकाळ करा)

(४) खूप सदाचारी माणूस. (उद्‌गारवाचक करा)

(५) पोपटाला आज डाळ दिली नाहीस ग. (प्रश्नार्थक वाक्य तयार करा)

(६) आपले खेळाडू चांगले खेळतात. (नकारार्थी वाक्य लिहा)

(७) तो व्यायाम करतो. (विध्यर्थी वाक्य लिहा)

(८) शिपाई धावत माझ्याकडे आला. (साधा भविष्यकाळ करा)

(९) तुला परवानगी मिळायची नाही. (प्रश्नार्थक वाक्य लिहा)

(१०) तू खूप अभ्यास केलास. (उद्‌गारवाचक वाक्य लिहा)

(११) सगळयात दोष असतात. (प्रश्नार्थक वाक्य लिहा)

(१२) लिपिकांनी टिप्पण्या लिहिल्या. (नकारार्थी वाक्य लिहा)

(१३) तो मोठा अधिकारी आहे. (विध्यर्थी लिहा)

(१४) ते काम करतात. (अपूर्ण भविष्यकाळ करा)

(१५) विद्यार्थी अभ्यासात भाग घेतील. (साधा भूतकाळ करा)

(१६) त्याने पैसे दिले असतील. (नकारार्थी वाक्य लिहा)

(१७) आत पाऊस पडेल. (प्रश्नार्थक वाक्य लिहा)

(१८) तू निघण्याची तयारी केलीस ? (आज्ञार्थी वाक्य लिहा)

(१९) मुले रोज खेळ खेळतात. (विध्यर्थी वाक्य लिहा)

(२०) तो मुंबईला जात आहे. त्याला औषध आणावयास सांगा. (संकेतार्थी वाक्य लिहा)

(२१) आमचे विद्यार्थी चांगला अभ्यास करतात. (नकारार्थी करा)

(२२) तू खूप चांगले काम केलेस. (उद्‌गारवाचक करा)

(२३) तो जातो. (विध्यर्थ करा)

(२४) पळत्या घोड्याचा वेध घेत घेत मी त्यावर उडी मारेन. (भूतकाळ करा)

(२५) जनता जनार्दन काय करू शकत नाही. (होकारार्थी करा)

(२६) ही कविता मला आवडते. (साधा भूतकाळ करा)

(२७) विनायक दादा वाट पाहता होता. (अपूर्ण वर्तमान करा)

(२८) काळा ढग सुंदर दिसत होता. (उद्‌गारार्थी करा)

(२९) "बा" स्वतः दयामायी होत्या. (नकारार्थी करा)

(३०) शांत कसे राहयचं अशा वेळी ? (आज्ञार्थी करा)

(३१) केशव आताच शाळेत गेला. (भविष्यकाळ करा)

(३२) सूर्योदय होईल. ( प्रश्नार्थी करा)

(३३) विद्यार्थी अभ्यास करीत होते. (वर्तमानकाळ करा)

(३४) फुले फार सुंदर आहेत. (उद्‌गारवाचक करा)

(३५) आकाश ढगाळ आहे. (नकारार्थी करा)

(३६) आज तुम्ही कार्यालयात काम केले. (प्रश्नार्थक वाक्य लिहा)

(३७) आपण असे म्हणावे. (नकारार्थी लिहा)

(३८) पत्र वाचून मला आनंद झाला. (भविष्यकाळ करा)

(३९) हे दूध मिळण्याचे ठिकाण आहे. (अधोरेखित शब्दांऐवजी एक शब्द)

(४०) केवढी आग लागली. (योग्य उद्‌गारवाचक अव्यय वापरा)

(४१) घरात सर्वांना आनंद मिळतो. (प्रश्नार्थक करा)

(४२) नोकराने भाजी आणली आहे. (नकारार्थी करा)

(४३) ते मूल हुशार आहे. (विध्यर्थी करा)

(४४) ती अभ्यास करत आहे. (अपूर्ण भविष्यकाळ करा)

(४५) मुलगा शाळेत जातो. (साधा भूतकाळ करा)

(४६) तू उपदेश करीत असस. (नकारार्थी करा)

(४७) तुम्ही सचिवाला भेटा. ( भूतकाळी प्रश्नार्थक करा)

(४८) तो लवकर परत आला. (साधा भविष्यकाळ करा)

(४९) तो हे काम करील. (विध्यर्थी वाक्य लिहा)

(५०) ही मुलगी हुशार व्हावी. (प्रश्नार्थक वाक्य लिहा)

**प्र. १०** खालील शब्दांपैकी योग्य पर्याय निवडून खालील वाक्यातील रिकाम्या जागा भरा आणि वाक्ये पुन्हा लिहा :- **१०**

१. (हमाल, चौथी, बिबट्या, वटवाघळे, गोदीत, काजवे, म्हाताऱ्या, गुंतावळा, महिना, व्रात्य)

(१) बुधा अगोदर ----------- काम करीत होता.

(२) रात्री ------------- उंबरांच्या झुबक्यांवर तुटून पडत.

(३) वाघरू म्हणजे ----------------.

(४) लंब्याने एका पपईच्या नळीत पाचपन्नास -------------- कोंबून बॅटरी केली होती.

(५) लंबोदर आमच्याबरोबर ---------------- पर्यंत होता.

(६) बुधा भायखळा ------------- स्टेशनवर म्हणून राहिला.

(७) शेवरीच्या कापसाच्या -------------- उडतात.

(८) उंच उंच झाडांच्या वर वेलींचा ------------- असायचा.

(९) या काळातील प्रत्येक वर्ष, प्रत्येक ----------, प्रत्येक दिवस एक परंपरा निर्माण करीत होता.

(१०) ----------पोरंच पुढं हुशार बनतात.

(अभिप्राय, शिवाय, प्रतीक्षाधीन, यथाशक्ती, रक्तपेढी, सुधारणा, अध्ययन, आकाशवाणीवर, महोदय, निदर्शन.)

२. (१) हल्ली प्रत्येक रुग्णालयात ---------- असावी.

(२) प्रत्येकाने संरक्षण निधीस --------- मदत करावी.

(३) पुढील पंधरा तारखेपर्यंत हे प्रकरण ---------- ठेवावे.

(४) या प्रकरणावर तुमचा --------- पाठवा.

(५) तुमच्या कामात ----------- दिसून येत नाही.

(६) जास्त पगार मिळावा म्हणून कर्मचाऱ्यांनी --------- केले.

(७) शासकीय पत्राच्या सुरूवातीस ---------- असे लिहितात.

(८) त्याच्या ---------- हे कोणीही काम करणार नाही.

(९) आम्ही ---------- बातम्या ऐकतो.

(१०) विद्यार्थी म्हणजे --------- करणारा मुलगा.

(आनंदी, स्नान-मंदिरातून, आला, व्यापक, ग्रंथांनीच, राजे, दयामयी, आहे मी !, वाकणार, करवली.)

३. (१) पोपटलाल ----------- गडी होता.

(२) खरं म्हणजे विदुषक हाच सर्कसचा -----------.

(३) नंतर अगदी सहजपणे म्हणाली ---------- "ठीक आहे !" ----------.

(४) साऱ्यांनी मला दूर केले परंतु या ----------- मला आसरा दिला.

(५) बा स्वतःच ---------- होत्या.

(६) आज शिवबा ---------- शोभले.

(७) बाबा आमटे ह्या नावाला आता ----------- अर्थ आहे.

(८) भावाच्या लग्नात ----------- सजली होती.

(९) डॅम इट..... मी मोडेन पण ----------- नाही.

(१०) माय धरणी ----------- बाहेर पडणाऱ्या तरुणीसारखी दिसत होती.

(वेडे, स्वर्गाच्या, आत्मा, पोपट, आहे मी, डॅम इट, अनावर, सत्याचे, सुदैवी, दर्शनाला, नजर)

४. (१) आपल्या लाडक्या मुलाचे नाव बाईंनी ----------ध्असे ठेवले होते.

(२) नंतर ती अगदी सहजपणे म्हणाली ---------- ठीक आहे !

(३) जरा ----------- व्हा.

(४) पांढरा ढग ----------- दारात पोहोचला.

(५) खरं म्हणजे विदुषक हाच सर्कसचा -----------.

(६) त्याचे हे ग्रंथवेड ----------- होते.

(७) ----------- मी मोडेन पण वाकणार नाही.

(८) जगात माझ्यासारखी ----------- दुसरी कुणी आहे ?

(९) त्यांच्या आयुष्यात ----------- तेज आहे म्हणून सारे जग त्यांना मानते.

(१०) मॉ साहेब राजांची ----------- तयार होते आहे.

(घास, साक्षात्कार, सौंदर्य, आयते, मरवा, निर्विकार, मावशी, लोक, पवित्र, अनावर.)

५. (१) दिव्यत्वाचा ---------- होता तो.

(२) माय मरो पण ---------- जगो.

(३) जे म्हातारपणीसुद्धा टिकते तेच खरे -----------.

(४) त्यांचे हे ग्रंथवेड ----------- होते.

(५) लहान तोंडी मोठा ----------- घेतोय.

(६) माईंना --------- फार आवडे.

(७) चेहरा ----------- ठेवून ते म्हणाले.

(८) सगळे ---------- माझ्यावर रागावले आहेत !

(९) हे रक्त बलिदानाचं आहे, ------------- आहे.

(१०) घरबसल्या ----------- खाऊन किती दिवस पुरणार.

(अंधार, करंटा, उसनवारी, उद्वेग, मुखरीत, जनताजनार्दन, ब्रह्मांड, कुरूक्षेत्र, कठोर, गडद.)

६. (१) ------------- काय करू शकत नाही !

(२) तिला ------------- आठवत होते.

(३) रात्रीचा ----------- मी म्हणत होता.

(४) त्यामुळे मित्र परिवाराकडे ---------- करण्याची पाळी येई.

(५) कोण ------------ तिच्याकडे पाठ फिरवील ?

(६) मला आता भाभीचा ------------- समजत होता.

(७) इतर लोक घरातल्या घरात ------------- माजवातात.

(८) राजे, एवढी ----------- शिक्षा ss

(९) त्या गीतात वेदना ----------- झाली होती.

(१०) ------------ अंधारात प्रकाशबिंदू दिसावा तसा !

(उपक्रम, प्रचंड, सावलीने, अनावर, हुरहूर, उलथापालथ, हिरकणी, काटकसर, उद्वेग, जगजाहीर.)

७. (१) वातावरण काळ्या ----------- कोंदले होते.

(२) आठच्या सुमारास ---------- सभा भरली.

(३) मनात केवढी ----------- झाली होती.

(४) कोळशाच्या ढिगाऱ्यात ----------- गवसावी तसा.

(५) त्यांचे हे ग्रंथवेड ----------- होते.

(६) ----------- करून प्रथम हे मित्रऋण फेडीत.

(७) काही काळ हा ---------- चालू राहील.

(८) मला आता भाभीचा ------------- समजत होता.

(९) उद्या सारे छापून ---------- करतील.

(१०) पण आज नर्मदेला विनाकारण ---------- वाटू लागली.

(दुष्टाव्याने, समस्या, राजभाषा, हाताखाली, मुळे, सुधारणा, वर, चुणीदार, क्वचित, आजन्म.)

८. (१) आम्ही मराठी शिकतो कारण की ती ------------- आहे.

(२) तापा ----------- तोंड कडू झाले आहे.

(३) भारतापुढे पुष्कळ ---------- उभ्या आहेत.

(४) तुमच्या कामात ------------- दिसून येत नाही.

(५) संत रामदास ----------- ब्रम्हचारी होते.

(६) राजांनी ----------- विजार घातली.

(७) त्या मुलांनी माझ्याशी ----------- वागायचे ठरवले आहे.

(८) त्यांच्या ----------- आम्ही काम करायचो.

(९) उद्योगी मनुष्य ----------- निर्धन असतो.

(१०) कारंजाचे पाणी ---------- उडते.

(झुपकेदार, सुदैवी, निरीक्षण, भ्रमात, उसनवारी, गर्रकन, समंजस, विनाकारण, एकमेकांनी, रिक्त.)

९. (१) आता मी काळजीपूर्वक ---------- करू लागलो.

(२) बोलरने हात ----------- फिरवला.

(३) मी मात्र आता पूर्वीच्या ----------- राहिलो नाही.

(४) कमरेला खोचलेली ----------- शेपटी त्याने समोर टाकली.

(५) जगात माझ्यासारखी ------------- दुसरी कोण आहे ?

(६) त्यामुळे मित्रपरिचितांकडे ------------ करण्याची पाळी येईल.

(७) माई कधी ----------- हस्ताने भेटल्या नाहीत.

(८) विदूषकाचे कपडे ----------- वापरले तरी चालत असे.

(९) आज नर्मदेला ---------- हुरहुर वाटू लागली.

(१०) भारतातील ------------- माणसांची मने गांगरून गेली होती.

(शिस्तीने, हवेशीर, आजन्म, अगदी, निवृत्त, स्फोटक, वारंवार, सोसावे, उत्तीर्ण, समर्पक.)

१०. (१) विद्यार्थ्यांनी वर्गात ----------- वागावे.

(२) अधीक्षक लवकरच ------------ होतील.

(३) हा बंगला ------------- आहे.

(४) जागतिक परिस्थिती फार ---------- आहे.

(५) त्याने माझा ----------- अपमान केला.

(६) रामदास ----------- ब्रम्हचारी होते.

(७) हा अहवाल ------------ गोपनीय आहे.

(८) व्यापाऱ्याने नुकसान का ------------- ?

(९) हुशार मुले परीक्षेत -------------- होतात.

(१०) तुमचे उत्तर ------------ आहे.

(पावसात, वस्तू, व्यायाम, कोणी, पक्षी, मंजूर, शिष्यवृत्ती, निदर्शन, प्रयोग, प्रकाशन.)

११. (१) मुलांनी ----------- खेळावे.

(२) अधिकाऱ्यांनी रजा --------------- केली होती.

(३) दुकानदाराने सर्व ------------- पाठवल्या.

(४) विद्यार्थ्यांनी रोज ----------- करावा.

(५) दूध ----------- आणले.

(६) ----------- आकाशात उडाले.

(७) हुशार मुले ------------- मिळवतात.

(८) प्रयोगशाळेत विद्यार्थी ----------- करतात.

(९) मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पुस्तकाचे ------------- झाले.

(१०) जास्त पगार मिळावा म्हणून कर्मचाऱ्यांनी --------- केले.